# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: २७ जून, २०२२

---

जळगाव दि.२७ (प्रतिनीधी), राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, पाल आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता आयोजित सॉफ्ट स्कील प्रशिक्षण वर्गाचे प्रभारी प्र-कुलगुरु प्रा. एस. टी. इंगळे यांच्या हस्ते आज दि. २७ जून रोजी उदघाटन झाले.

यावेळी व्यासपीठावर जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेचे समन्वयक आणि वैद्यकीय अधिकारी डॉ.ए.आर. लाडवंजारी, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. जे.बी. नाईक, प्रभारी अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे हे उपस्थित होते. याप्रसंगी बोलतांना प्रा.एस. टी. इंगळे म्हणाले की, उच्च शिक्षणात मोठया प्रमाणावर बदल होत आहेत. त्यामुळे या प्रशिक्षणाचा फायदा विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांना होणार आहे. सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ.सुनील पाटील यांनी केले.

या प्रशिक्षण वर्गात प्रशिक्षक रागीब अहमद यांनी सकारात्मक दृष्टिकोण आणि ताणतणाव व्यवस्थापन या विषयावर प्रशिक्षण दिले. प्रशिक्षक सतिष वानखेडे यांनी ध्येय निश्चिती व प्रेरणा आणि संवाद कौशल्य या विषयांवर प्रशिक्षण दिले. दि. २७ जून ते १ जुलै पर्यंत दररोज ५० कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. या प्रशिक्षण वर्गाचे आयोजन रसायन व तंत्रज्ञान संस्थेत करण्यात आले आहे. या प्रशिक्षण वर्गात एकूण २६० अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. या प्रशिक्षण वर्गाच्या आयोजनासाठी डॉ. रमेश सरदार व त्यांचे सहकारी परिश्रम घेत आहेत.

**बातमी क्र. २**

जळगाव दि.२७ (प्रतिनीधी), कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील शिक्षणशास्त्र विभागातील सन २०२०-२१ मधील एम. एड. अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला.

या प्रसंगी अध्यक्षस्थानी शिक्षणशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. मनीषा इंदाणी तर प्रमुख पाहुण्या म्हणून माजी विभाग प्रमुख तथा कवी कुलगरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय नागपूर येथील सेवानिवृत्त प्रा. डॉ. इंदुमती भारंबे, प्रा. जयश्री शिंगाडे, संशोधक विद्यार्थिनी जयश्री पाटील या व्यासपीठावर उपस्थित होत्या. प्रा.भारंबे यांनी यावेळी सांगितले की, कोविड १९ महामारीच्या परिस्थितीत उद्भवलेल्या शिक्षण क्षेत्रातील समस्या विचारात घेऊन शिक्षणाची ज्ञानगंगा अविरत सुरू रहावी यासाठी शिक्षणशास्त्र विभागाकडून अनेकविध उपक्रम राबविण्यात आले प्रसंगी ऑनलाईन अध्ययन अध्यापन पद्धतीच्या माध्यमातून शिक्षण प्रक्रिया सुरू ठेवली.

पल्लवी श्रीरसागर, मनीषा आमले यांनी स्वागतगीत सादर केले. या प्रसंगी द्वितीय वर्षाचे विद्यार्थी बसरा पावरा, पंकज राजपूत, मनीषा आमले, भुषण चौधरी यांनी दोन वर्षाचा अनुभव आपल्या मनोगतातुन व्यक्त केला. विभागातील सहाय्यक प्रा. डॉ. संतोष खिराडे, प्रा. समाधान कुंभार, प्रा. डॉ. रणजीत पारधे यांनी मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. कार्यकमाच्या अध्यक्षा प्रा. डॉ. मनीषा इंदाणी यांनी आपल्या मनोगतातुन नेट-सेट, पीएच. डी. व स्पर्धा परीक्षेची तयारी कशी तयारी करावी याचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक विजयामाला घोगडे यांनी केले. सूत्रसंचालन महेंद्र कुमावत व दीपक पाटील तर आभार भुषण पाटील यांनी मानले. कार्यक्रमाचे आयोजन द्वितीय वर्षांचे विद्यार्थी पंकज राजपूत, भुषण चौधरी, महेंद्र कुमावत यांनी केले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी अखिल तडवी, नीलिमा पाटील, वैशाली अलोनी, श्रुतिका बोरसे, मनीषा पाटील व सर्व विद्यार्थी तसेच विभागातील शिक्षकेतर कर्मचारी जयेश पाटील व विष्णु कोळी यांनी परिश्रम घेतले.

---

अ अ

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी